February-2022 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**Peer Reviewed, Referred & Indexed Journal**

**Issue 285(A)**

**Chief Editor -**
Prof. Ritika Hemdev,
I/c Principal, Sinhgad College of Commerce,
Plot No: 126, MHADA Colony, Chandivali,
Mumbai-400072, Maharashtra, India.

**Executive Editors –**
Dr. Saquib Ahamd Khan (Department of Mathematics and I.T.)
Prof. Samita Gharat (Department Accountancy)
Prof. Shivani Ahluwalia (Department of English)
Prof. Khushbu Joshi (Department of Commerce)

**Co-Editors –**
Mr. Nandkumar Baburao Banate (Librarian)
Prof. Fariya Siddiqui (Department of Management Studies)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Sinhgad College of Commerce, Chandivali, Mumbai-400072, India.

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

E-ISSN : 2348-7143
February-2022


| | | | |
|---|---|---|---|
| 21 | Using Multi-Sensory Instructional Approaches for Students with Special Educational Needs to Provide Various Learning Opportunities in an Inclusive Classroom Settings | Fr. Baiju Thomas | 117 |
| 22 | Customers' Awareness and Product Knowledge Towards Private Banks in Satara District | Dr. Sachin Suryawanshi | 126 |
| 23 | A Study on Digital Marketing and its Impact Ambattur | Dr. Prabhu Dayanithi, R. Balakrishnan | 133 |
| 24 | Hybrid Office- A New Approach to Work | Mrs. M. Prathibha | 137 |
| 25 | A Critical Review of Digital Marketing | Dr. M. Venkatesan | 143 |
| 27 | Representation of Partition after Mathin History, Fictional and Oral Narratives of Sindhi | Avani Jitendra Ved, Dr. Manish K. Pandya | 151 |
| 28 | Challenging Jobs in Open Educational Resources Retrieval System in India | Mr. Kishor Waghmare | 156 |
| 29 | डॉ. आंबेडकर के आर्थिक विचारो का एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. बृजेन्द्र सिंह बौद्ध | 162 |
| 30 | कोविड - १९ के दौरान तनाव | अनिरुद्ध गोयल | 169 |
| 31 | आदिवासी महिला सक्षमीकरणासाठी शासकीय योजना | सौ. सुचिता रमेश म्हात्रे, डॉ. डी. व्ही. पवार | 174 |
| 32 | ग्रंथालयांचे समाजासाठी योगदान | सौ. दिप्ती कोलगे, डॉ. श्री. गंगाराम बुवा | 181 |
| 33 | माहिती तंत्रज्ञान युगात डिजिटल ग्रंथालय एक वरदान | श्री लिनताज ऊके | 184 |
| 34 | 'हिंदू स्त्रीचा उदय आणि पतन' या वरील डॉ. बी. आर. आंबेडकरांचे विचार | डॉ. जनार्दन कांबळे | 189 |
| 35 | स्थानिक गरजा हेच ग्रामीण विकासाचे खरे तंत्र | डॉ. महावीर सदावर्ते | 194 |
| 36 | शैक्षणिक संशोधन व समाजशास्त्र | डॉ. पुरुषोत्तम मनगटे | 199 |
| 37 | देशाच्या सक्षमीकरणासाठी महिला सक्षमीकरणाची गरज | उपेंद्र रमेश गलांडे | 204 |
| 38 | दापोली तालुक्यातील आंबा प्रक्रिया उद्योगात काम करणा-या स्त्रीमजुरांचा टिकात्मक अभ्यास | डॉ. दिलीप पाटील, अजय लोखंडे | 208 |
| 39 | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यास | प्रियंका माळवे, महादेवी काटकर | 215 |
| 40 | भारतातील ऑनलाइन शिक्षण पद्धती - एक आव्हान | डॉ. दिलीप पाटील, प्रा. विवेक चव्हाण | 223 |
| 41 | लोकसाहित्य संशोधन पद्धती | डॉ. अनिल बांगर | 228 |
| 42 | भारतीय ग्रंथालय चळवळ | सौ. दिप्ती कोलगे, डॉ. श्री. गंगाराम अनंतपुरी बुवा | 234 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 285 (A) : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
February-2022

# लोकसाहित्य संशोधन पद्धती

**डॉ. अनिल बळीराम बांगर**
(मराठी विभाग प्रमुख)
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी
महिला महाविद्यालय-पेझारी,
ता. अलिबाग, जि. रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८०९२१११

लोकसाहित्य म्हणजे पारंपारिक लोकजीवन पद्धती,लोकमानसाची अभिव्यक्ती असल्याने लोकजीवनाच्या अभ्यासात लोकसाहित्यास अनन्यसाधारण महत्व आहे.लोकजीवनाचा अभ्यास करताना त्या लोकजीवनात प्रचलित असलेल्या परंपरा,लोकसमजुती, लोकश्रद्धा, आचार-विचार, रूढी.प्रथा,विधी-विधाने तसेच मौखिक रूपातील शब्द आविष्कार इ. घटक विचारात घ्यावे लागतात.लोकजीवनातील मौखिक परंपरेने घडणाऱ्या शब्द आविष्कारातून लोकवाङ्मयाला संपन्नता येत असते. लोकवाङ्मय हे त्या पारंपारिकलोकजीवनाचे अविभाज्य अंग असल्याने लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यात पहावयास मिळते म्हणजेच लोकजीवनाचा अभ्यास करताना लोकसाहित्य महत्वाचे ठरते.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व आता जवळपास जागतिक स्तरावर सर्वमान्य झाले आहे. लोकसाहित्य हे भाषाशास्त्र, वाङ्मय, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्त्वविद्या, वैद्यकशास्त्र अमा मानवी जीवनाशी संलग्नित शास्त्रे व ज्ञानशाखा यांना सामग्री पुरविणारे अभ्यासक्षेत्र आहे हेही अनेक अभ्यासकांनी आपल्या संशोधनातून सिद्ध करून दाखविले आहे. तरीही लोकसाहित्य या अभ्यासविषयाला स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. ही जशी एक वस्तुस्थिती आहे, त्याप्रमाणेच विविध ज्ञानशाखांना स्रोत पुरविणाऱ्या लोकसाहित्याच्या अभ्यासकाला एखाद्या ज्ञानशाखेतील तज्ज्ञ अभ्यासक म्हणून अद्याप मान्यता मिळालेली नाही, हे सुद्धा खरे आहे. हे सत्य 1953 मध्ये Folk-lore Conference of the National Folk Festival परिषदेच्या अध्यक्षीय भाषणातून प्रो. फिलिप जॉर्डन यांनी मांडले आहे. ते म्हणतात की, "अद्याप लोकसाहित्यविशारदाला सामाजिक किंवा सांस्कृतिक इतिहासज्ञ म्हणून आपले स्थान प्रस्थापित करणे जमलेले नाही. आजही या परिस्थितीमध्ये फरक पडला आहे असे ठामपणे म्हणता येण्याजोगे नाही.

एका बाजूने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व जागतिक स्तरावर मान्य होणे, लोकसाहित्य हा मानवी जीवनाशी संलग्नित असलेल्या शास्त्रांना, ज्ञानशाखांना सामग्री पुरविणारा महत्त्वपूर्ण विषय म्हणून मान्य होणे आणि दुसरीकडे लोकसाहित्याला स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता नसणे, लोकसाहित्य विशारदाला आपले स्थान प्रस्थापित करण्यात अपयश आले असल्याचे मान्य करणे या बाबी सकृद्दर्शनी विसंगत वाटतात. परंतु थोडा बारकाईने विचार केल्यास लोकसाहित्याच्या अभ्यासाचा आजचा दृष्टिकोन आणि प्रारंभीच्या काळी लोकसाहित्याच्या संकलनाची दिशा व विश्लेषणापुरती सीमित असलेली अभ्यासाची पद्धती यांच्या स्वरूपामुळे लोकसाहित्याबद्दलची ही तर्कविसंगत निरीक्षणे रूढ झाल्याचे दिसून येईल. मराठीतील लोकसाहित्यविषयक अभ्यासामध्ये तर हे जास्त प्रकर्षाने दिसून येते.

मराठीत लोकसाहित्याच्या संकलनाला आणि चर्चेला गेल्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभ झाला. 1858 मध्ये मेरी फ्रियर या लेखिकेचे 'Old Deccan Days' हे काही लोककथा, दंतकथा यांचे संकलन असणारे पुस्तक प्रसिद्ध झाले. नंतर अनेक मराठी अभ्यासकांनी लोकसाहित्यविषयक सामग्रीचे संकलन केले. हे संकलन प्रामुख्याने लोकगीतांचे केले गेले आहे. त्यातून नकळतपणे मौखिक वाङ्मय म्हणजेच लोकसाहित्य अशी धारणा प्रारंभीच्या काळात रुजली. परिणामी मौखिक वाङ्मयाचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास या भूमिकेतूनच प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत लोकसाहित्यविषयक साधनसामग्रीचे संकलन करण्यात आले असल्याचे दिसून येते. या साधनसामग्रीचे विश्लेषण करताना 'लोकसाहित्य' आणि 'लोकवाङ्मय' या संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या गेल्या. दुर्गा भागवतांनी Folk Literature साठी 'लोकवाङ्मय' आणि Folk-lore साठी 'लोकसाहित्य' हे संकल्पनात्मक मराठी प्रतिशब्द सुचवेपर्यंत हे दोन्ही शब्द वेळोवेळी एकाच अर्थाने वापरले जात होते. मराठीतील लोकसाहित्याच्या प्रारंभीच्या अभ्यासकांच्या ठिकाणी असलेल्या शास्त्रीय अभ्यासदृष्टीच्या अभावाचे द्योतक म्हणून हे उदाहरण निर्देशिता येईल. शास्त्रीय दृष्टीच्या अभावाचा लोकसाहित्याच्या अभ्यासावर दूरगामी परिणाम झाल्याचा दिसून येतो. तो परिणाम असा की, प्राचीन काळापासून महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या लोकपरंपरेबद्दलची लोकसाहित्यविषयक विपुल साधनसामग्री संकलित झाली, परंतु या सामग्रीचे तर्कसुसंगत, शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असणारे लोकसाहित्यविषयक सैद्धांतिक शास्त्रीय लेखन अगदीच तुरळक प्रमाणात झालेले आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व लक्षात आल्यामुळे विविध ज्ञानशाखांचे अभ्यासक लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळले. त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास विविध दृष्टिकोनातून केला जाऊ लागला. या अभ्यासकांच्या विचारसरणीतून ,लोकसाहित्याकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीतून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय उदयास आले. त्यातून हे अभ्यासक्षेत्र अधिक विकसित होत गेले. अभ्यासकांना नवी दृष्टी लाभली. त्यातून पुन्हा लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या नवनवीन दिशा खुल्या झाल्या. त्यातून लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या विविध पद्धती निर्माण झाल्या. अशा काही अभ्यास पद्धतींची ओझरती ओळख येथे करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**कार्यान्वयी अभ्यास पद्धती :**

लोकसाहित्याच्या या अभ्यास पद्धतीत लोकसाहित्याचे मुख्य कार्य हा विचार लक्षात घेऊन अभ्यास केला जातो. लोकसाहित्याची निर्मिती स्वाभाविकपणे होत असली तरी त्यामागे आविष्काराचे कार्य असू शकते. लोकरूढी-प्रथा, लोकश्रद्धा, विधी तसेच मौखिक शब्द आविष्कार यातून लोकमानस एक प्रकारचे कार्य साधित असते. त्यामागे कोणता तरी हेतू असतो. लोकसाहित्याचे हे कार्य लक्षात घेऊन लोकसाहित्याचा अभ्यास करण्याच्या या पद्धतीला कार्यान्वयी अभ्यास पद्धती असे नाव प्राप्त झाले.

अमेरिकेतील सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञांनी लोकसाहित्याच्या या कार्याचा प्रामुख्याने आपल्या अभ्यासात विचार केला. लोकसाहित्याचा अभ्यास त्याच्या सांस्कृतिक कार्याच्या दृष्टीने फ्रांझ बोआस या मानवशास्त्रज्ञाने करून अभ्यासकांना नवी दृष्टी दिली. डॉ. ब्रॅनिस्लो मॅलिनोस्की या मानवशास्त्रज्ञाने 'दैवकथा या कार्यान्वयी कथा आहेत. त्यामागे विशिष्ट हेतू आहे.' हा विचार मांडला. त्याच्या या मताने, दैवकथातून आदिम जीवनातील श्रद्धास्थाने, नीतिमूल्ये, विधी आचरणाचे महत्व स्पष्ट करण्याचे कार्य केले जाते हे लक्षात येते. लोकसाहित्याच्या या अभ्यासपद्धतीत लोकजीवनातील विधी, विधीकथा, लोककथा, लोकगीते इत्यादींचे समाजजीवन संदर्भातील कार्य लक्षात घेतले जाते.

E-ISSN : 2348-7143
February-2022

**संदर्भान्वयी अभ्यास पद्धती :**

लोकसाहित्यातील सामुग्रीचा अभ्यास करताना त्यांचे परस्परांतील संबंध लक्षात घेऊन लोकसाहित्य प्रकाराचा अभ्यास करण्याच्या या पद्धतीला संदर्भान्वयी अभ्यास पद्धती म्हटले जाते. लोकवाङ्मयाचा अभ्यास करताना विधी, रूढी, प्रथा इत्यादींचा अभ्यास त्यांचे संदर्भ लक्षात घेऊन केल्यास अभ्यासविषयाला योग्य न्याय मिळतो. लोकवाङ्मयाच्या संदर्भात विधींचा अभ्यास तर विधींच्या संदर्भात लोकवाङ्मयाचा अभ्यास अशी पद्धती म्हणजेच संदर्भान्वयी अभ्यास पद्धती होय. लोकवाङ्मयातील विधीगीतांचा अभ्यास या पद्धतीने केल्यास या अभ्यासाला पूर्णत्व येते. विधीनाट्य, लोकनृत्ये, लोकगीत, लोकचित्रकला यांचा अभ्यास अनेक संदर्भांनी केला जाऊ शकतो.

संदर्भान्वयी अभ्यास पद्धतीत लोकसाहित्य प्रकारांचा अभ्यास करताना त्या प्रकाराशी संबंधित विविध पैलू विचारात घेऊन अभ्यास केला जातो. त्यामुळे भाषा, संस्कृती, समाजजीवन विशेष, लोकमानस असे अनेक संदर्भ या अभ्यासाला लाभतात व अभ्यास सर्वांगीण होऊ शकतो.

**रचनारुपी अभ्यास पद्धती :**

लोकसाहित्यातील लोकवाङ्मयाचे रचना विशेष लक्षात घेऊन किंवा लोकवाङ्मयाच्या भाषेची रचना-शब्द, वाक्प्रचार, वाक्य, गीतातील चरण यांच्या रचनेचे स्वरूप लक्षात घेऊन अभ्यास करण्याच्या या पद्धतीस रचनानुसारी अभ्यास पद्धती म्हटले जाते. अशा स्वरूपाच्या अभ्यासातून शाब्द लोकसाहित्य प्रकाराचे आकृतिबंध लक्षात येऊ शकतात. लोकवाङ्मयातील लोककथांचा अभ्यास करताना ही अभ्यासपद्धती अधिक उपयुक्त आहे. लोककथेचा विकास करताना त्यातील कथाविशेष, कल्पनाबंध, कथेतील पात्रांच्या कृती यांचा अभ्यास करून लोककथेच्या रचनातंत्राची माहिती मिळू शकते.

रचनानुसारी अभ्यास पद्धतीच्या जनकत्वाचा मान ब्लाडिमीर प्रॉप या अभ्यासकाला दिला जातो. त्याच्यानंतर अॅलान डडेस या अभ्यासकाने लोकसाहित्याच्या अभ्यासात ही पद्धती स्वीकारली.

**आंतर सांस्कृतिक पद्धती :**

मानवी संस्कृतीच्या अभ्यासाचे एक महत्वाचे साधन म्हणून लोकसाहित्याच्या सामुग्रीचा उपयोग मानवशास्त्रज्ञांनी करून लोकसाहित्य आणि मानवशास्त्र यांच्यातील अतूट संबंधावर प्रकाश टाकला. त्यांच्या या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून आंतर सांस्कृतिक अभ्यासपद्धती अस्तित्वात आली. लोकसाहित्याच्या अभ्यासाची आंतरसांस्कृतिक पद्धती ही मानवशास्त्रीय संप्रदायाचीच एक शाखा आहे.

निरनिराळ्या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या निरनिराळ्या लोकसमूहात रूढ असलेले विधी, प्रथा, लोकविश्वास, लोकसमजुती, लोकगीते, लोककथा इत्यादींचा अभ्यास करून त्यांचे वेगळेपण तसेच त्यांच्यातील सारखेपणा लक्षात घेऊन त्याच्या कारणांची मीमांसा या अभ्यासपद्धतीत केली जाते. साधरणत: १९६० नंतर ही अभ्यासपद्धती लोकसाहित्याच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासात स्वीकारली गेली. अॅलन लोमॅक्स या लोकसाहित्य विशारदाने सांस्कृतिक विशेषांचे आंतरसंबंध आपल्या अभ्यासातून स्पष्ट केले. लोमॅक्स यांनी आपल्या अभ्यासासाठी निरनिराळ्या संस्कृतीतील लोकगीतांची निवड करून लोकगीतांचा व लोकसंस्कृती विशेषांचा तुलनात्मक अभ्यास केला. व संस्कृती-संस्कृतीतील आंतरसंबंध तसेच साम्यभेद लक्षात घेतले.

**समाजभाषा वैज्ञानिक पद्धती :**

लोकसाहित्यातील शाब्द आविष्काराचा म्हणजेच लोकवाङ्मयाचा अभ्यास समाजभाषा वैज्ञानिक पद्धतीने केल्यास सामाजिक वास्तव अधिक नेमकेपणाने लक्षात येऊन सामाजिक आंतरसंबंधाचेही आकलन या अभ्यासपद्धतीतून होऊ शकते. समाजभाषा विज्ञानात समाजजीवनातील अनुभव व भाषा यांच्यातील परस्पर

E-ISSN : 2348-7143
February-2022

संबंध लक्षात घेऊन या अनुभवाने भाषा कशी समृद्ध होते त्याचबरोबर भाषेला एक वेगळे परिमाण कसे लाभते हे विचारात घेतले जाते. भटक्या जाती-जमाती आपल्या अनुभव विश्वाच्या आविष्कारासाठी जे भाषिक संचित वापरतात ते त्यांच्या अनुभवातून साकार झालेले असते. सांकेतिक व गुप्त भाषा हे एक या समाजाचे भाषिक संचितच आहे. स्त्री-गीतातील शब्द, भाषा स्त्रीनिष्ठ अनुभवाला व्यक्त करते.

**वर्णनात्मक पाहणी पद्धती :**

आधुनिक काळात सर्व ज्ञानांगे वर्णनप्रधान होत आहेत. त्या दृष्टीने वर्णनात्मक पद्धतीचे महत्त्व अनन्य आहे. तसे पाहता शोधसंकल्पनाच्या प्रारंभीच्या अवस्थेतही वर्णन पद्धतीस महत्त्वाचे स्थान आहे. त्या वेळी विषयाचे घटक स्पष्ट झालेले नसतात. त्यांच्या पृथक्करणाचाही प्रश्न निर्माण झालेला नसतो. अशा वेळी सर्वसाधारण वर्णनाद्वारे शोधविषयाचे स्वरूप स्पष्ट करण्यास वर्णनपद्धतीचा बराच उपयोग होतो. नवीन नवीन अंगे शोधून काढण्यासाठी ( एक्स्प्लोरेशन ) वर्णनपद्धतीचा खूप उपयोग होतो. त्याशिवाय कोणत्याही शोधसंकल्पात जेव्हा सशोधनाचे काम संपते व शोधाहवाल लिहिण्याची अवस्था प्राप्त होते त्या वेळी आपण जे जे प्रयत्न शोधकार्यासाठी केले त्याचे अभ्यासकास अलिप्तपणे वर्णन सादर करावे लागते. ते कार्य या पद्धतीच्या अवलंबनाने साधते.

कोणत्याही शोधनाचे उद्दिष्ट नवे सत्य प्रकाशात आणणे हेच असते. हे निरनिराळ्या प्रकारांनी साधले जाते काही नवीन माहिती किंवा नवे ज्ञान प्राप्त करून देणे, एखादा सिद्धान्त ' प्रस्थापित करणे, निरनिराळे घटकावयव असतात त्यांच्या परस्पर संबंधांची नवी जाणीव करून देणें, तसेच एखादा आंतभेदक दृष्टिकोन ( इनसाइट ) मांडणे, सोडवावयाच्या प्रश्नांसंबंधी अधिक बिनचूक वा नवी माहिती सादर करणे इ प्रकार या संदर्भात लक्षणीय आहेत. संशोधन क्रियेत जो पाया असतो तो मूलभूत महत्त्वाचा असतो त्यात चूक होणे हे धोक्याचे ठरते. वर्णनपद्धतीच्या योगाने संकल्पाची पायाभरणी चांगली होते. उपलब्ध असलेली माहिती, साधनसामग्री ही नेमकेपणाने शब्दांकित करणे म्हणजे वर्णन हे तसे सोपे नाही. त्याशिवाय वर्णनपद्धतीला एक स्वतंत्र शोधक्रिया म्हणून अनन्यसाधारण महत्व आहे कारण साधनसामग्री विविध प्रकारची असते ती विविध मार्गांनी मिळवावी लागते. ती अनेकदा संख्यास्वरूप ( क्वॉन्टिटेटिव्ह ) असते. कित्येकदा गुणरूप ( क्वालिटेटिव्ह ) असते. कोणतीही असली तरी ती प्राप्त करून घेण्याचे निरनिराळे रूढ मार्ग आहेत. नवेही मार्ग अवलंबावे लागतात. साहजिकपणे आपल्या शोधसंकल्पाचे जेव्हा फलित सांगण्याची आवश्यकता निर्माण होते, त्यावेळी माहिती कशी मिळविली, ती शोध साहाय्यक कशी आहे, हे सारे वर्णनपद्धतीने साध्य केले जाते.

प्राचीन भारतीय वादपरंपरेत पूर्वपक्ष व उत्तरपक्ष हे दोन भाग असत. उत्तरपक्षात आपले जे विरोधक आहेत त्यांचे म्हणणे समर्पक युक्तिवादानो खोडून काढलेले असते. परंतु ते खोडून काढण्यापूर्वी जे प्रतिपक्षाचे म्हणणे आहे, ते बिनचूकपणे आपल्या शब्दांत सांगावे लागत असे. त्यासाठी पूर्वपक्षांची तरतूद होती व हा पूर्वपक्ष बरोबर आहे असे प्रतिपक्षीयांनी सांगितले की मग उत्तरपक्षात त्याचे खंडन करणे सुरू होत असे. वर्णनात्मक पद्धतीचे संशोधनात स्थान या वाद क्रियेतील पूर्वपक्षासारखे आहे. वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करून जेव्हा पूर्णपणे साधनसामग्री, मिळविलेली माहिती, जे काय असेल ते बिनचूकपणे मांडली जाते तेव्हा संशोधनास सुरुवात होते. अशी ही वर्णनपद्धती दिसावयास साधी पण अतिशय महत्त्वाची आहे. विषयानुरूप तिचे स्वरूप बदलते. एखाद्या गोष्टीचा ऐतिहासिक आढावा घेणं हेही वर्णनपद्धतीत बसते. हा आढावा अर्थातच पूर्वग्रह रहित असावा.

E-ISSN : 2348-7143
February-2022

**सर्वेक्षण क्षेत्र पाहाणी पद्धती :**

संशोधनक्रियेशी संबद्ध असणारी ही एक महत्त्वाची अभिक्रिया (ॲक्टिव्हिटी) आजचे सामाजिक जीवन अतिशय गुंतागुंतीचे झालेले आहे. त्याच्या विविध अंगात प्रत्यही नवे नवे प्रश्न, नव्या नव्या समस्या निर्माण होत असतात व कित्येकदा त्यांची सोडवणूक करणे, उपाययोजना करणे आवश्यक ठरते. त्यासाठी अगदी पहिली गोष्ट म्हणजे ती समस्या काय आहे समजून घेणे महत्त्वाचे आहे. नंतरच उपाय योजनेचा मार्ग मोकळा होतो. यासाठी सर्वदृष्टींनी सर्वे किंवा सर्वेक्षण किंवा पाहणी पद्धती अवलंबिणे आवश्यक ठरते.उपाययोजना बिनचूक व प्रभावी व्हावयाची असेल तर ही पाहणी अतिशय शास्त्रशुद्ध वस्तुनिष्ठ व निराग्रही भूमिकेवरून होणे आवश्यक असते. सामाजिक समस्यांच्या बाबतीत वस्तुनिष्ठता वा निराग्रह या गुणांचा निरपवाद आढळ होणे कठिणच. पण जास्तीत जास्त अलिप्तपणे हे काम होणे अगत्याचे होते.

या पाहणीचे एक तंत्रच उत्क्रांत झाले आहे. प्रथम तिचे एकांकन ठरविणे. त्या युनिटचे परत पृथक्करण करून प्रत्येकासंबंधीची कोणती माहिती मिळवावयाची हे निश्चित करून ती उपलब्ध करण्याचे मार्ग ठरविणे. ते ठरवीत असताना जास्तीत जास्त अलिप्तपणा असावा.अनेकांच्या साहाय्याने हे माहिती संकलन होणे अपरिहार्य असते. त्यामुळे संबंधीत व्यक्तीला मिळवावयाच्या माहितीबाबत व माहिती जमविण्याच्या पद्धती बाबत सुस्पष्ट सूचना दिलेल्या असाव्यात. त्यांना थोडे फार प्रशिक्षणही द्यावे. अशी प्रयोजित माहिती जमली की, तिचे संकलन करणे, वर्गीकरण करणे, ती सुगम वा बोधक रीतीने मांडण्याचे निरनिराळे मार्ग ठरविणे, त्यासाठी इतरांनी केलेल्या पाहणींचा आधार घेणे योग्य ठरते. हे सारे होत असता माहितीचे पृथक्करण आपोआपच होते व शेवटी प्रत्यक्ष समस्या कोणती / कोणत्या/ याचे सविवेचक नेमकेपण स्पष्ट करणे अवश्य असते. त्या उपायांवरही नियंत्रण ठेवण्याची तरतूद सुचवावी लागते. अगदी शेवटी सर्वसामान्य तत्वविवेचन करणे महत्त्वाचे असते. त्यायोगेच पाहणीचे विद्वत्क्षेत्रीय मोल वाढते.

ही पाहणी कित्येकदा अतिशय विस्तृत व व्यापक असते. तो एक स्वतंत्र प्रकल्पच असतो. त्या ठिकाणी अर्थातच अनेक स्तरांवरील अनेक विषय हे तसे जवळ जवळ स्वतंत्र स्वरूपाचे असतात. त्यांचे स्वरूप व शोधकार्य हे त्या अभ्यासकाने आपल्या विषयाच्या स्वरूपाच्या दृष्टीने व एकंदर शोध प्रकल्पाच्या मर्यादेत बसेल असे ठरवावे लागते.

कोणत्याही प्रकारची पाहणी असो, तिने बरीचशी माहिती एकत्र केली जाते, उजेडात आणली जाते. उपाययोजना ही त्या मानाने तात्कालिक असली तरी या निमित्ताने जे विचारमंथन होते ते कायम महत्वाचे असते. पाहणीविषयाला कोणतीही बंधने नाहीत. सुक्ष्म दृष्टी आपल्या विषयाची नेमकी जाण, पाहणीचे तत्क्षेत्रीय महत्त्व, या गोष्टी मनावर बिंबवलेल्या असणे अवश्य असते. पाहणीसाठी अनेक मार्गांचा अवलंब अपरिहार्य ठरतो. त्या दृष्टीने प्रश्नमालिका, मुलाखत, प्रयोग आयोजन, या अभिक्रियांची वैशिष्टे लक्षात घेणे अवश्य असते.

संशोधन ही अतिशय सर्वव्यापक व सर्वगामी अशी एक ज्ञानक्षेत्रीय संकल्पना आहे. ज्ञान व संशोधन यांचे नाते अभिन्न आहे. संशोधनानेच ज्ञानक्षेत्रे संपन्न होत राहाणार आहेत व त्यांतील संपन्नता निरनिराळ्या विषयांच्या संशोधनाला उदंड अवसर देत राहाणार आहे. शोधक्रियेमागे सत्यशोधक ही जरी प्रमुख प्रेरणा असली तरी ज्ञानक्षेत्र, त्याचे स्वरूप, त्याची वैकासिक अवस्था, समकालीन विशिष्ट गरज, प्रवृत्ती, उपलब्ध ज्ञान, व साधनसामग्री आणि शोधकाची तयारी व कुवत या सर्व घटकांमुळे संशोधनाचे स्वरूप बदलते. प्रत्येक

E-ISSN : 2348-7143
February-2022

ज्ञानक्षेत्र वा विषय यांची संशोधनात्मक भूमिका वेगळी असली तरी काही अंगे वा अवस्था समान असतात. त्यामुळे संशोधन म्हणून सर्वसाधारण समानता असूनही विषयपरत्वे वेगळेपणाही जाणवण्याइतका स्पष्ट असतो.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे क्षेत्र जराजसे विकसित होत आहेत तस तसे लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध दृष्टीकोनही निर्माण होत आहेत. त्यातून लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या विविध पद्धती उदयास येत आहेत.लोकसाहित्य या विविध अभ्यास संप्रदायातून, अभ्यासपद्धतीतून लोकसाहित्याच्या अभ्यासाला शास्त्रीय बैठक लाभली हे महत्वाचे.

**संदर्भ :**

१. डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, पृ. १७
२. दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. २,३
३. तत्रैव, पृ. १०, ११
४. शोधविज्ञान कोश, डॉ. दु.का. संत, पुणे विद्यार्थी प्रकाशन, पुणे
५. मौखिकता आणि लोकसाहित्य, मधुकर वाकोडे/ सुषमा करोगल, साहित्य अकादमी प्रकाशन
६. लोकसाहित्य उद्गम आणि विकास, शरद व्यवहारे, विश्वभारती प्रकाशन, नागपूर